महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.**

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in
**Website**: www.jdroamt.org
**Fax No**: (0721) 2577913

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /२०२३/ 146
दिनांक :- 16 JAN 2023

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अभियांत्रिकी पदवीका संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी विकसीत करुन घेण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीच्या उपयुक्ततेबाबत अभिप्राय.**

संदर्भ :- मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- ३/तंशिस/आयटी सेल/अभिप्राय/२०२२-२३/०७ दिनांक १३/१/२०२३.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम व थेट व्दितीय वर्ष अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी संगणकीय प्रणाली विकसित करुन घेण्यात आलेली होती. सदर प्रणालीच्या उपयुक्ततेबाबत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेशित विद्यार्थी व संस्था यांचेकडून अभिप्राय (Feedback) घ्यावयाचे आहेत. याकरीता विद्यार्थी व संस्था त्यांचे अभिप्राय प्रथम वर्ष प्रवेशासाठी http://poly22.dte.maharashtra.gov.in व थेट व्दितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी http://dsd22.dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर लॉगीन करुन देण्याबाबतचे संदर्भिय पत्र जोडलेले असून त्याचे अवलोकन करावे. व त्यामध्ये दिलेल्या सुचनाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, या प्रणालीव्दारे विद्यार्थी व संस्था Feedback Module मध्ये विचारलेल्या विविध मुद्यांबाबत आपले मत १ ते १० या श्रेणी (Scale) मध्ये व भविष्यातील सुधारणांसाठी टिप्पणी/सुचना दिनांक ११/१/२०२३ ते २०/१/२०२३ या कालावधीत नोंद करु शकतात. याकरीता सबंधित संस्थेने सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांकडून अभिप्राय घ्यावयाचे आहे.

तरी याबाबत आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त कालावधीत विद्यार्थी व संस्थेचे अभिप्राय नोंद करावेत व याबाबत काही अडचणी उद्‌भवल्यास तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई येथील कार्यासन क्रमांक ३ मध्ये संपर्क साधावा.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

**(डॉ. वि.रं. मानकर)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याबाबत.